# हुरडा पार्टी

**शालेय सहल व हुरडा पार्टी**

आनंददायी शालेय सहल व निसर्गाच्या सानिध्यात हुरडा पार्टी साठी कल्याणम कृषी पर्यटन केंद्र, काटगाव फाटा, तांदुळवाडी, हैदराबाद रोड, सोलापूर.

मो. ९८६०६३४८३४ / ९८६००९३०११



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com



# सेवेकरी भरती

१) सुपरवायझर- १ । २) पुजारी- १
३) शेतगडी जोडी- २ । ४) सफाई सेवेकरी- १
५) वॉचमन- ३ । ६) स्वयंपाक बाई-१

यांप्रमाणे सेवेकरी भरती चालू आहे
होतकरू गरजू यांनी संपर्क साधावा

पत्ता:- श्री स्वामी समर्थ सेवा आश्रम ट्रस्ट
अक्कलकोट-सोलापूर रोड १२१ कान्होळी अक्कलकोट
संपर्क:- 8625050111



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक १८९ वा | शनिवार, दि. ०१ मार्च २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# भुरट्यांनो, पुस्तकं जाळा, माणसं जाळा, सगळ्यांचीच राख करा !


**दत्तकुमार खंडागळे**
मो. 9561551006


परवा इतिहास अभ्यासक इंद्रजीत सावंत यांना नागपुरच्या कुणी प्रशांत कोरटकर नावाच्या बांडगुळाने धमकी दिली आहे. प्रशांत कोरटकर नावाचा हरामखोर इंद्रजीत सावंत सरांना धमकी देताना छत्रपती शिवरायांच्याबद्दल अतीशय हलकट प्रवृत्तीने बोलला आहे. तो जे बोलला आहे ते ऐकताना कानात कुणीतर शिसे ओतत आहे असं वाटतय. तो हरामी कोरटकर छत्रपती शिवरायांना एकेरी बोलत तुमचा राजा पळून गेला असे म्हणतो. त्याने बोलताना जेम्स लेनच्या हरामखोरीचाही उल्लेख केलाय. महाराजांचे बॉयलॉजिकल फादर कोण आहेत? ते सांगा म्हणत माता जिजाऊंच्या चारित्र्यावर चिखलफेक करतोय. या अशा प्रसंगातून जेम्स लेन विदेशी होता पण त्याच्या मागे या देशी औलादीच आहेत. त्यांनीच ही सगळी घाण पेरली आहे. याचा प्रत्यय येतो. चित्रलेखाचे संपादक ज्ञानेश महाराव यांनी त्यांच्या अग्रलेखातून या विदेशी तोंडावळ्यामागे देशी मस्तक असल्याचे त्यावेळी ठासून मांडले होते. कोरटकर नावाच्या हरामखोराने मस्तवालपणे त्याचा उल्लेख करत ते विष जेम्स लेनच्या नव्हे तर या नराधमांच्याच मस्तकातले आहे याचा पुरावा दिला आहे. ही जातीयवादी गँग इतकी मस्तावली आहे की त्यांना कशाचेच भान राहिले नाही. त्यांना केंद्रातल्या आणि राज्यातल्या सत्तेचा प्रचंड माज आलाय. मलाही परवा संभाजी भिडेंच्या काही धारकड्यांनी धमकी देत तुझे पुस्तक जाळ, चुलीत घाल, बाहेर काढलस तर बघ, पोरं पाठवून देतो ! अशा पध्दतीची धमकी दिली आहे. ९०६७३६४५७३ या नंबरवरून सदरच्या बांडगुळाने मलाही घरी येवून मारण्याची, पोरं पाठवून देण्याची धमकी देत पुस्तकं जाळून टाकण्याची तंबी दिली आहे. या भुरट्यांना घाबरून आम्ही लिहायच व बोलायच थांबणार नाही. त्यांनी कितीही बुड आपटले, जीव जरी घेतला तरी थांबणे शक्य नाही. याची नोंद या भामट्यांनी घ्यावी. मग ते इंद्रजीत सावंत असतील किंवा अन्य कुणी. वज्रधारीचा आवाज बंद होणे तर कधीच शक्य नाही. मग या लोकांनी कितीही ताकद लावावी. सत्तेचे साखळदंड घालावेत, नाहीतर गोळ्या घालाव्यात. सत्य सांगण्यापासून आम्हाला कुणीही रोखू शकणार नाही. याची नोंद या बावळ्यांनी घ्यावी. या लोकांशी वाद नाहीच, ही बहूजन आय-बापांचीच वाट चुकलेली लेकरं आहेत. त्यांच्या मेंदूत जे जातीयवादी किडे वळवळत आहेत त्याचा संबंध आहे. हे किडे महाराष्ट्रधर्माच्या, शिवरायांच्या विचाराला पोषक नाहीत. ही घाण महाराष्ट्र धर्माला मोडीत काढणारी आहे.

हे सगळं भयंकर आहे. महाराष्ट्रात जे सुरू आहे ते महाराष्ट्राचा तालिबान झाल्याचे दर्शवणारे आहे. भविष्यात या सगळ्या गोष्टीचे भयंकर परिणाम भोगावे लागणार आहेत. हे नाही थांबलं तर खुप मोठ्या अनथार्ला सामोर जावं लागेल. या लोकांनी एकदा अवघ्या देशाचीच वाट लावून टाकावी. सत्य सांगणारी पुस्तकं जाळावीत, माणसं जाळावीत, सगळ्या-सगळ्याची राख करावी. अवघ्या देशाला शेंडी लावा. महाराष्ट्राचे, देशाचे वाटोळे करा. समृध्द वारसा असलेला भारत जातीयवादाच्या आगीत जाळून राख करा. इतकं केल्यावर तरी तुमचं मन भरणार आहे का ? 'ब्राम्हण्य' वादाच्या मुळव्याधीने ग्रासलेले हे काही लोक स्वत:सोबत राज्याचीही वाट लावणार आहेत. कोरटकर, राहूल सोलापुरकरसारखी बांडगुळ जे बडबडत आहेत ते त्यांच्यासह त्यांच्या समाजाला अनर्थाकडे घेवून जाणारं आहे. त्यांच्या बोलण्यात, वागण्यात आणि अजेंड्यात जो जातीयवादाचा कंड आहे तो त्यांचीही माती करेल. या देशात ब्राम्हण समाजातल्या अनेकांचे मौल्यवान योगदान आहे पण पेशवाई मानसिकतेने ग्रस्त असलेले काही अडाणचोट सगळ्या जातीलाच अडचणीत आणत आहेत. ही टिनपाट बांडगुळं सुयार्ला गिळण्याची स्वप्ने पाहत आहेत. पण हा शिवसुर्य त्यांचे बुड जाळून टाकल्याशिवाय राहणार नाही. भामटा सोलापुरकर किंवा कोरटकर हे दृष्य रूपातले किडे आहेत. कोरटकर किंवा सोलापुरकर जे बोलत आहेत ते एका षढयंत्राचा भाग असावा असे वाटते आहे. या भडव्यांच्या मागे त्याच निच मनोवृत्तीचे हजारो आहेत. त्यांना वाटतय की पुन्हा पेशवाई आलीय, सर्वत्र आमचं राज्य आलय, आमचंच सरकार आलय. म्हणूनच कोरटकर नावाचा भुरटा मस्तवालपणे शिवरायांचा अवमान करत होता. सध्या देशात दिसणारे चित्र तसे असेलही पण ज्या दिवशी शिवभक्त आणि मराठी माणूस पेटून उठेल तेव्हा या भडव्यांची अवस्था फार वाईट होईल. औरंगजेबाचे राज्य अवघ्या भारत वर्षात होते, पण मावळ्यांनी त्याला महाराष्ट्राच्या मातीत गाडलाच. औरंग्याकडे तुलनेत सैन्यही खुप होते. पण त्याचेही राज्य नष्ट झाले. मग हे कोण लागून गेले लाठी-काठीवाले नटरंग ? कोरटकर, सोलापुरकर सारख्या बांडगुळांनी याचे भान ठेवावे. भाजपाचेच आणि 'ब्राम्हण' वादाने पछाडलेलेच लोक शिवरायांचा अवमान सातत्याने का करत आहेत ? या मागे त्यांचे काय कारस्थान आहे ? ते बहूजन बावळ्यांनी समजून घ्यावे. जातीयवादी 'ब्राम्हण्य' ग्रस्ताने पछाडलेल्या काही भटांच्या नादाला लागून त्यांची विष्ठा प्रसाद म्हणून खाणाऱ्या बहूजन बावळ्यांनी आपला खरा बाप कोण आहे ते ओळखावे ? ज्यांना आपला बाप कोण ? आपला इतिहास काय? याचे भान रहात नाही, स्मरण होत नाही त्यांना कुणी वाचवू शकत नाही. हे बहूजन बावळे म्हणजे पंचतंत्रातल्या बेडकाच्या औलादीचे आहेत. स्वत:च्या सत्तेसाठी, मान-सन्मानासाठी जातीचाच शत्रू असलेल्या सपार्ला विहिरीत घेवून जाणारा बेडूक आणि हे बावळे एकाच लायकीचे आहेत. मुर्ख बेडकामुळे सोकावलेला साप सर्वांनाच गिळंकृत करतो. विहिरीत घेवून जाणा-या बेडकाचीही पिल्ली तो गट्टम करतो. बावळ्या बेडकाच्या जेव्हा लक्षात येते तेव्हा वेळ गेलेली असते. संघवाल्यांच्या मांड्या चोळणा-यांनी याचे भान ठेवावे. पण सत्तेसाठी, पैशासाठी आईला आई आणि बापाला बाप न म्हणण्याचा कृतघ्नपणा करणा-यांचा पहिला बळी जाणार आहे. हा सोकावलेला सर्प त्यांनाही सोडणार नाही. 'ब्राम्हण्य' वादी सत्तेच्या स्तनाला चिकटलेल्या गोचिडांना यातून कुणी वाचणार नाहीत. त्यांचीही अवस्था पंचतंत्रातल्या बेडकासारखीच होणार आहे.

ज्या समाजाला हिंसेची, इतरांच्या रक्ताची तहान लागते, ज्या समाजाला विद्वेषाची कावीळ होते, जो समाज सुडाने पेटतो, बदल्याच्या भावनेने चरफडतो तो समाज स्वत:च विध्वंसाची वाट चालतो. ज्या समाजाला सृजनतेची, रचनात्मकतेची, प्रेमाची घृणा वाटते असा समाज इतिहासाच्या पानावरही उरत नाही. तो स्वत: नष्ट होतोच पण त्यांच्या सोबत गेलेल्या इतरांचेही वाटोळे करतो. आजवरचा जगाचा इतिहास याला साक्षी आहे. सध्या महाराष्ट्राची वाटचाल त्याच दिशेने आहे. 'ब्राम्हण्य' वादाच्या जातीयवादी गंडाने चवताळलेले काही पेशवाई किडे स्वत:ची वाट लावून घेणारच पण त्यांच्यासोबत असलेल्या लोकांचाही वाट लावणार आहेत. सध्या ते ज्या पध्दतीने आक्रमक झालेत, माजलेत ते पाहता त्यांचा अंत असाच होणार. हे दांडे गोतास काळ ठरणार आहेत. वर्ण वर्चस्ववादाच्या विकृतीने आणि सुडाने पेटलेले हे पेशवाई किडे स्वत:सोबत आपल्या संपुर्ण बांधवांच्या विणाशाचे कारण ठरू नयेत. प्रारंभी सत्तेच्या जोरावर हे लोक इतरांच्यावर अत्याचार करतील. झुंडशाही करतील, दादागिरी करतील पण कधीतर सुप्तावस्थेत असलेला तमाम समाज जागा झाल्याशिवाय राहणार नाही. महाराष्ट्राच्या मातीत पुन्हा गवताला भाले फुटतील. शिवराय आणि संभाजी राजांच्या, महात्मा फुले, शाहू, आंबेडकरांच्या गुणवत्तेचे बीज नक्की उगवून येईल. या माणसांच्या विचारातून नक्कीच क्रांतीची ठिणगी जन्माला येईल. तोवर भुरट्यानो तुम्ही माजून घ्या. मस्तवालपणे उन्मादाने बेदरकार व्हा. तोवर सगळं जाळा. पुस्तकं जाळा, माणसं जाळा. पण तीच सुडाची आग तुमचीही एक दिवस राख करेल याचे भान ठेवा.

## माण नदीत उन्हाळ्यात टेंभूचे पाणी सोडण्याचे नियोजन - आ. समाधान आवताडे

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** पर्यावरण संवर्धन बरोबर माण नदीचा काठ हरित करणे साठी पुढाकार घेऊ. माण नदीत उन्हाळ्यात टेंभूचे पाणी सोडण्याचे नियोजन आहे असे मत पंढरपूर - मंगळवेढा विधानसभा मतदार संघाचे आमदार समाधान आवताडे यांनी व्यक्त केले.



पंढरपूर तालुक्यातील सिध्देवाडी येथे कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाचे वतीने आयोजित राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचा समारोप कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शन करताना ते बोलत होते. या प्रसंगी माजी सभापती वसंतराव देशमुख, रयत शिक्षण संस्थेचे सचिव जे. जी जाधव, उप प्राचार्य बी एस बळवंत, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव, सरपंच रोहिणी सारंग जाधव, सरपंच संजय साठे, माजी पंचायत समिती सदस्य संजय पवार, विठ्ठलचे संचालक दशरथ जाधव, माजी सैनिक बाबुराव गोडसे, कल्याण जाधव, सोमलिंग देवस्थान ट्रस्ट, चे अध्यक्ष साहेबराव जाधव, ग्रामपंचायत सदस्य सुरेश गोडसे, प्रगतीशील बागायत दार बालाजी माणिक जाधव , संतोष जगन्नाथ जाधव, आप्पा जाधव, रमेश बनसोडे, माजी उपसरंपच बालाजी जाधव, आनंदराव क्षिरसागर, दिपक भालेकर, पांडुरंग बाजीराव जाधव, प्रमुख उपस्थित होते. प्रास्तविक रासेयो चे कार्यक्रम अधिकारी डॉ. डी एस चौधरी यांनी केले.

प्रारंभी स्वागत पर भाषणात जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव यांनी. स्वच्छतेतून सेंद्रीय शेतीकडे गावाची वाटचाल सुरू आहे. माण नदीच्या काठांवर वृक्ष लागवढ हाती घेणेत येणार आहे. बांबु लागवडी बरोबर पर्यावरण संवर्धना साठी हरित माण नदीङ्क. पर्यटन स्थळ म्हणून विकसीत करणेत येत असल्याचे सांगितले.

आमदार समाधान दादा आवताडे म्हणाले, सेंद्रीय शेती साठी सिध्देवाडी करांनी घेतलेला पुढाकार महत्वपुर्ण आहे.

माण नदीच्या संवर्धना साठी सवोतीपरी प्रयत्न व मदत करणेत येईल. माण नदीत उन्हाळ्यात पाणी राहणे साठी उजनी तून शक्य नाही झालेस टेंभुर्णी योजनेतून सोडण्यात येणार पाणी सोडण्याचे नियोजन सुरू आहे. रयत शिक्षण संस्थेतील मधील अधिकारी, कर्मचारी व प्राध्यापक यांनी एकत्रित केलेले परिश्रमामुळे संस्था वटवृक्षा प्रमीणे मोठी झाली आहे. असेही आमदार समाधान आवताडे यांनी सांगितले. या प्रसंगी प्रारंभी कर्मवीर भाऊराव पाटील यांचे प्रतिमेचे पूजन आमदार आवताडे यांच्या हस्ते करणेत आले. या प्रसंगी सेपक टकरा या क्रिडा प्रकारात राष्ट्रीय पातळीवर उत्कृष्ठ कामगिरी केले बद्दल नम्रता दिगंबर घुले व भक्ती दिगंबर घुले यांचा आमदार समाधान आवताडे यांचे हस्ते सन्मानित करणेत आले. या प्रसंगी प्रा. सौ. सुमन केंद्रे, प्रा नाईकवनरे, प्रा शेख, यांचे सह ग्रामविकास अधिकारी महादेव भुसे, धनश्री कदम, दत्ता दांडगे, यांचा आमदार समाधान आवताडे यांचे हस्ते गौरव करणेत आला. या कार्यक्रमा साठी विजय प्रकाश जाधव, पांडुरंग बाजीराव जाधव, भास्कर जाधव, राव साहेब भोपळे, यांनी शिबीर यशस्वी करणे साठी परिश्रम घेतले. आभार प्रा सुमन केंद्रे यांनी मानले.

## मुलींच्या कमी संख्येमुळे लग्नसंस्थेवर परिणाम

**हजार मुलांमागे ९३१ मुली**

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मुलांच्या विवाहाची समस्या दिवसेंदिवस गंभीर होऊ लागली आहे. त्यातूनच अनेकांची फसवणूक देखील होत आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे, अनेक वर्षापासून मुलींचा घटत असलेला जन्मदर हे आहे. सोलापूर शहरात एक हजार मुलांमागे ९३६ तर जिल्ह्यात हे प्रमाण ९३१ पर्यंत आहे. मंगळवेढा, माढा, उत्तर सोलापूर या तालुक्यात अजूनही एक हजार मुलांमागे ९२२ इतके मुलींचे प्रमाण आहे. गरजू कुटुंबीयांनाही मुलगी ओझे वाटू नये, यासाठी केंद्राने सुकन्या योजना आणली. शेकडो कोटींचा निधी खर्च करून 'बेटी बचाओ बेटी पढाओ' अभियान राबविले. राज्य सरकारने लेक लाडकी योजना आणली, उच्च शिक्षणही मोफत केले, अनेक प्रवर्गातील मुलींना शिष्यवृत्ती दिली.



## सोलापूरकरांची दोन महिन्यांची चिंता मिटली

### 'उजनी'तून सोडलेल्या पाण्याने औज बंधारा भरला



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहरासाठी उजनी धरणातून सोडलेले पाणी गुरुवारी (दि. 27) सकाळी औज बंर्धायात पोहोचले आहे. बंधारा पूर्ण साडेचार मीटर भरल्याने या पाण्याची वाटचाल चिंचपूर बंर्धायाकडे सुरू आहे. सध्या चिंचपूर बंधाराही तीन मीटर भरला आहे. शुक्रवारी (दि. 28) सकाळपर्यंत हा बंधाराही भरणार आहे. दोन्ही बंधारे ओव्हर फ्लो झाल्यामुळे सोलापूर शहराची 50 ते 60 दिवसांची पाण्याची चिंता मिटली आहे. सोलापूर शहराला पाणीपुरवठा करणारा औज बंधारा कोरडा पडल्यामुळे उजनी धरणातून सोलापूर शहरासाठी भीमा नदीपात्रातून पाणी सोडण्यात आले होते. 17 फेब्रुवारीला सोडलेले पाणी दहा दिवसांचा प्रवास करून 27 फेब्रुवारीला औज बंर्धायात पोहोचले आहे. तब्बल 180 किलोमीटरचा प्रवास करून हे पाणी येण्यास दहा दिवसांचा कालावधी लागला आहे. औज आणि चिंचपूर हे दोन्ही बंधारे पूर्ण क्षमतेने भरल्यामुळे सोलापूर शहराची पन्नास ते साठ दिवसांची पाण्याची चिंता मिटली आहे. उपलब्ध पाणी साधारण 15 एप्रिलपर्यंत पुरेल, इतका साठा औज आणि चिंचपूर बंर्धायांमध्ये झाल्याचे सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे यांनी सांगितले.

## वाल्मिक कराडला 'VIP ट्रीटमेंट' मिळत असल्याचा आरोप

### देशमुख कुटुंबिय आक्रमक

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** संतोष देशमुख हत्या प्रकरणातील संशयित आरोपी वाल्मिक कराड सध्या तुरुंगात आहे. मात्र, त्याला तुरुंगात व्हीआयपी ट्रीटमेंट दिली जात असल्याचा आरोप केला जातो आहे. या आरोपांनंतर आता देशमुख कुटुंबियांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. याप्रकरणी तुरुंग प्रशासनाकडे सीसीटीव्ही फुटेजची मागणी करणार असल्याचं देशमुख कुटुंबियांकडून सांगण्यात आलं आहे.



वाल्मिक कराडसह इतर आरोपी सध्या बीड जिल्हा कारागृहात आहेत. मात्र, या ठिकाणी त्यांना व्हीआयपी ट्रीटमेंट दिली जात असल्याचा आरोप गेल्या काही दिवसांपासून होतो आहे. या आरोपानंतर विविध चर्चांनाही उधाण आलं आहे. देशमुख कुटुंब कारागृह प्रशासनाकडे याची तक्रार दाखल करणार आहे.

याशिवाय कारागृहातील सीसीटीव्ही फुटेज मिळावे, अशी मागणीही तक्रारीद्वारे केली जाणार आहे. कारागृहातील काही अधिकारी आणि कर्मचारी वाल्मिक कराडला सहकार्य करत असल्याचा आरोप देशमुख कुटुंबियांकडून करण्यात आला आहे. तुरुंग प्रशासनाने आमच्या मागणीची दखल न घेतल्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस याच्याकडे यांच्याकडे तक्रार करू असा इशाराही त्यांनी दिला आहे.

यासंदर्भात बोलताना, आरोपींना व्हीआयपी ट्रीटमेंट द्यायची असेल, तर त्यांना तुरुंगात न ठेवता एखाद्या रेस्ट हाऊसमध्ये किंवा फ्लॅटमध्ये ठेवावं. आरोपींना आरोपींसारखी वागणूक दिली जात नसेल तर त्यांना तुरुंगात कशाला ठेवता?, अशी संतप्त प्रतिक्रिया धनंजय देशमुख यांनी दिली.

दरम्यान, संतोष देशमुख हत्या आणि अवादा कंपनीकडे मागण्यात आलेली दोन कोटी रुपयांची खंडणी प्रकरणी वाल्मिक कराडसह इतर आरोपींविरोधात विशेष न्यायालयात १४०० पानांचे दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. हे दोषारोपपत्र राज्य गुन्हे अन्वेषण विभागाने विशेष मकोका न्यायालयात दाखल केले आहे.




## संपादकीय

# भाजपमध्ये खदखद?

महाराष्ट्र, हरियाणा, राजस्थान, मध्य प्रदेश आणि मणिपूर या राज्यांमध्ये काही समान सूत्र आहेत. एक या सर्व राज्यांमध्ये मणिपूरचा आताचा अपवाद वगळता भारतीय जनता पार्टीचे सरकार आहे, तर दुसरे या राज्यांमध्ये भाजपअंतर्गत मतभेद आहेत. यातील महाराष्ट्राबाबत बोलायचे झाले तर पक्षांतर्गत मतभेद जाहीरपणे समोर आले नसले तरी आता कुजबुज असल्याचे सत्तेच्या वतुर्ळात फेरफटका मारल्यावर कळते. तथापि, युतीतील उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यात फारसे सख्य नसल्याचे दिसते. स्वतः शिंदेंनी कोणतेही कोल्ड वॉर नसल्याचे सांगितले असले तरी त्यांनीच असेही सांगितले की 'मला हलक्यात घेऊ नका'. हा इशारा उद्धव ठाकरे यांना असावा असा काहींचा कयास असेल. प्रत्यक्षात देवेंद्र फडणवीस यांना तो इशारा असल्याचे जाणकारांचे म्हणणे आहे. वर उल्लेख केलेल्या राज्यांमधील काही बातम्या गेल्या महिना-दोन महिन्यांत हेच सूचित करत आहेत की भाजप बलाढ्य पक्ष झाला असला आणि वरून सर्व काही ठिकठाक दिसत असले तरी दिसते तसे नाही. पक्षाच्या संदर्भात आज जे काही संकेत मिळत आहेत त्यांची काँग्रेस पक्षाच्या इतिहासाशी तुलना केली तर भाजपमध्ये हे फार झटपटच होते आहे असे वाटते.

काँग्रेसच्या सुरुवातीच्या टप्प्यात पंडित नेहरूंसारखा मोठा नेता असल्यामुळे त्यांना प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष आव्हान देणे सोडाच, स्वप्नातही आव्हान देण्याचे कोणाचे धारिष्ट्य नव्हते. जे त्यांचे तेच इंदिरा गांधींच्या काळात होते. वास्तविक इंदिराजींना काही आव्हाने देण्याचा प्रयत्न झाला. त्यातले अनेक नंतर काँग्रेसच्या मूळ प्रवाहात म्हणजे इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखाली नाक घासत परत आले. जे आले नाहीत ते राजकीय वनवासात गडप झाले. राजीव गांधी यांना तुलनेने कमी काळ लाभला व त्यात त्यांचा वरचष्मा राहिला. सोनिया गांधीही जेव्हा काँग्रेसच्या केंद्रस्थानी होत्या तेव्हा त्यांच्या अथॉरिटीला आव्हान नव्हते. 2014 चा पहिला पराभव आणि 2019 च्या लोकसभा निवडणुकीत त्याची झालेली पुनरावृत्ती यानंतर काँग्रेसला ओहोटी लागण्यास सुरुवात झाली. गांधी हे आडनाव आपल्याला सत्तेपर्यंत पोहोचवू शकत नाही असा साक्षात्कार झालेल्यांनी पक्षाला रामराम करण्यास आणि त्याही पलीकडे फर्स्ट फॅमिलीवर तोफ डागण्यास सुरुवात केली. गल्लीपासून दिल्लीपर्यंत काँग्रेस होती त्या काळात म्हणजे 2019 किंवा अगदी 2022-24 पर्यंत म्हटले तरी चालेल काँग्रेसमध्ये तो एक दरारा होता आणि आजही तो कायम असल्याचे अनेक ठिकाणी दिसून येते. त्या तुलनेत भाजपात आताच विसंवादाच्या दिशेने प्रवास सुरू झाला आहे की काय अशी शंका यावी अशा घटना घडू लागल्या आहेत. महाराष्ट्रात जे काही चालले आहे ते जाणकारांच्या नजरेतून सुटले असावे असा भाजप नेत्यांचा कदाचित समज झालेला असू शकतो. वस्तुस्थिती मात्र तशी नाही. गेल्या पाच वर्षांत महाराष्ट्रात ज्या घडामोडी घडल्या त्यातून राज्यातील जनता अधिक राजकीय साक्षर झाली आहे. शिंदे काहीही म्हणत असले आणि मुळात ते काहीतरी म्हणत आहेत यातच वेगळा वास येतो व त्याचे उगमस्थान दिल्ली असल्याचे दिसते. ज्या महाशक्तीची भलावण शिंदेंनी पूर्वी केली होती ती महाशक्ती पंतप्रधान नरेंद्र मोदी नाहीत कारण त्यांचे व्याप वेगळे आहेत. त्या स्थितीत त्यांनी पक्षाची सूत्रे ज्यांच्याकडे सोपवली होती किंवा आहेत त्या अमित शहांकडेच सगळी बोटे जातात.

2014 ते 2024 हा भाजपचा दहा वर्षांचा कालखंड पाहिला तर भारतीय राजकारणावर त्यांनी निर्विवाद वर्चस्व राखले आहे. काही अपवाद वगळता बहुतेक ठिकाणी भाजप घट्ट पाय रोवून उभा आहे. कोणाच्या नेतृत्वामुळे आणि कोणाच्या कथित मायक्रो मॅनेजमेंटमुळे पक्षाचा प्रभाव वाढला असेल आणि यश मिळत असेल तर सहसा त्या नेत्याला आव्हान देण्याचे धारिष्ट्य दाखवले जात नाही. मात्र, महाराष्ट्रातच नव्हे तर उत्तर प्रदेश, कर्नाटक, राजस्थान, मध्य प्रदेश आणि मणिपूरमध्येही ते दाखवले जाते आहे. एका रात्रीत राज्याचा मुख्यमंत्री बनवण्याची ताकद असणाऱ्या शहांकडेच सगळी सूत्रे केंद्रित झाली आहेत याचाच हा परिपाक आहे की लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर जे. पी. नड्डा यांनी केलेल्या विधानानंतर पुन्हा आपली ताकद सिद्ध करत भाजपची मातृसंघटना भाजपच्या कर्त्यांना त्यांच्या शक्तीची जागा दाखवून देत आहे? उत्तर प्रदेशातील पहिल्या योगी राजवटीत अधिकाऱ्यांपासून प्रमुख नियुक्त्यांचे निर्णय दिल्लीतूनच घेतले गेले. आता योगी स्वतःच निर्णय घेऊ लागले आहेत.

महाराष्ट्राच्या संदर्भात कथित दिलजमाईसाठी फडणवीस आणि शिंदेंची बैठक अलीकडेच दिल्लीत झाल्याचे म्हणतात. तथापि, त्यानंतरही फडणवीसांनी शिंदे सरकारच्या अगोदरच्या सर्व निर्णयांची छाननी सुरू केली आहे. त्यामुळे 'मला हलक्यात घेऊ नका' असे इशारेवजा वक्तव्य करण्यात आल्याचे म्हटले जाते. कर्नाटकात येडियुरप्पा आणि त्यांच्या प्रदेशाध्यक्ष पुत्राच्या विरोधात उघड संघर्षाचा पवित्रा घेतला गेला आहे. सबुरीचा सल्ला देऊनही कोणीही केंद्रीय नेतृत्वाचे ऐकण्याच्या मनस्थितीत नाही. मध्य प्रदेशात शिवराजसिंह चौहान यांचा स्वतःचा प्रभाव होता. पर्रिकरांसारखे त्यांनाही दिल्लीत बळजबरीने बोलावले गेले; पण त्या राज्यात आज भाजपचेच नेते पक्षाला अडचणीत आणणारे आरोप आपल्या सरकारवर करत आहेत.

मणिपूरमध्ये वादग्रस्त मुख्यमंत्र्यांचे संरक्षण करणे अशक्य झाल्यावर पुढील नेता निवडीसाठी एकमत होऊ न शकल्यामुळे राष्ट्रपती राजवट लादावी लागली. राजस्थानातही ज्येष्ठ नेते फोन टॅपिंगच्या मुद्द्यावरून आपल्याच पक्षावर बाण सोडत आहेत. दिल्ली, हरियाणा, महाराष्ट्र या राज्यांत प्रचंड विजय मिळवूनही जर केंद्रीय नेतृत्वाला आव्हान दिले जात असेल तर भाजपला हा शुभ संकेत नाही. काँग्रेसला जे सत्तर वर्षांनी भोगावे लागले ते भाजपमध्ये एवढा वेळ घेणार नाही हाच यातला अर्थ.

**प्रबोधन**

# सोने आणि माती । मोल भिन्न त्यांचे

आजकाल आयुष्यावर बोलून काही लोक जगताहेत आणि त्यांच्या अनुभवहीन पांचट गप्पा रिकामटेकडी प्रेक्षक मंडळी मोठ्या कौतुकाने ऐकून उसनं ओशाळं हास्य करत असतात. अनुभवावरूनच ज्ञान मोजण्याचा सल्ला देताना निकोलस ब्रेटॉन म्हणाले, 'अनुभव हीच ज्ञानाची जननी आहे.' खरंय ते! अनुभव नसेल तर ज्ञान कोठले? आयुष्यावर बोलणारे वयाची पन्नाशीही न गाठलेले असतील, तर ते श्रोते म्हणून जमलेल्या ज्येष्ठांपुढे कशी अक्कल पाजळणार? असे तारतम्य नसलेले प्रकार सर्वत्र दिसून येणं, ही खेदजनक बाब आता रोजचीच झाली आहे.

संतसाहित्यावर तर तारतम्यहीनपणाची जोरदार टीका होऊ शकते, इतकं ते विसंगत, विसंवादी, जीवनविन्मुख, पथभ्रष्ट आहे, याचा विचार मात्र कुणी करीत नाही. रामदासस्वामी लग्नातून पळून गेल्याची गोष्ट खरी असेल, तर आधी प्रपंच करावा नेटका अशी सुरुवात ते संसार न करता कशी काय करू शकतात? रामदासस्वामींनी नेटकाही संसार केला नाही आणि विटकाही संसार केला नाही. मग त्यांनी गृहस्थांना उपदेश करावा किंवा मूखार्ची लक्षणं लिहून भोळ्याभाबड्यांची चेष्टा करावी, ही गोष्ट तारतम्याला धरून वाटत नाही. सामान्य लोक समाजातले व्यावहारिक, प्रापचिक, सामाजिक, रूढीग्रस्त, परंपराप्रदूषित जीवन जगताना कशी अडथळ्यांची शर्यत पार करता करता मेटाकुटीला येतात, याचा अनुभव संतांना जवळजवळ नव्हता. व्यक्तिगत जीवन जगताना संत सज्जन, शुद्धाचरणी असतील. पण त्यांनी जो उपदेश आपल्या साहित्यातून केला, तो शुद्ध इहवादी नाही. त्यात वैचारिक स्पष्टता आणि सरळपणा नाही. भक्ती-मुक्तीचं पालुपद जोडल्याशिवाय त्यांचे विचार पूर्णच होत नाहीत आणि भक्ती- मुक्ती ही तर प्रापंचिक मागार्तील धोंड, मोठा अडथळा आहे. म्हणूनच लौकिक जीवनाचं तारतम्य नसलेलं संतसाहित्य समाजाच्या भौतिक सुखसमृद्धीच्या दृष्टीने बाधक आहे.

सूरदासांनी कृष्णाच्या बाललीलांवर पाच हजार पदं लिहिलीत. पण आपल्या नातवंडाच्या बाललीलेवर एकही पद त्यांना न सुचणं, हे तारतम्य सुटल्याचं लक्षण नव्हे? उलट, या संतांच्या बायको मेली कटकट गेली, पोर मेले छान झाले अशा माणूसघाण्या मनोवृत्तीस, काय म्हणावे? महाराष्ट्रातील एका संताने तर आपलं घर जळालं, ही बातमी ऐकून पेढा तोंडात टाकला, अशी गोष्ट आहे. हा संतस्वभाव हा मानवी संवेदनशीलतेचा अधःपात आहे.

भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्यापासून आजपर्यंत अनेक धनाढ्य घराणी राजकारणाशी जवळीक साधून राहिली, हा त्यांच्या चतुरपणाचाच एक भाग मानला पाहिजे. महात्मा गांधींनी ज्या बिर्ला घराण्याशी, बजाज घराण्याशी जवळचे संबंध ठेवले, या घराण्यांनी तरी महात्मा गांधींची संपत्तीविषयक विश्वस्त कल्पना (Trusteeship) स्वीकारली काय? उलट, आज तर ही टाटा, बिर्ला, बजाज घराणी नफेखोरीत अग्रेसर आहेत. पण ती धर्मांध पक्ष-संघटना-संस्थांना मदत करीत असतील, तर या धर्मनिरपेक्ष राष्ट्राने त्यांच्याशी जवळीक न ठेवण्याचं तारतम्य बाळगायला हवं. बिर्लासारखे लोक संगमरवरी मंदिर उभारतात, पण शोषित-पीडित-उपेक्षितांकडे लक्ष देत नाहीत. मग अशा धनाढ्यांच्या पाठीत समाजवादी सोटे मारण्याचं तारतम्य समाजवादी समाजरचनेशी बांधील आणि प्रतिज्ञाबद्ध असलेल्या शासनाने दाखवायला नको का? वास्तविक, भारतीय संविधानातसुद्धा सामान्य भारतीय जनतेचा तरतमभावाने विचार करणं अपूर्ण राहिलं आहे. भारतीय कररचना पद्धती किती सदोष आहे, हे सांगायला अर्थतज्ज्ञांची गरज नाही. मध्यम, उच्च मध्यम, श्रीमंत, अतिश्रीमंत आणि सर्वोच्च श्रीमंत यांच्याकडून क्रमाने आपण ३०, ४०, ५०, ६०, ८० अशा वाढत्या टक्केवारीत जर कर वसुली करीत नसू, तर समाजवाद प्रत्यक्षात कधीच येणार नाही. याबाबतीत शासन तारतम्यहीन वर्तन करतं. गोंद्यापेंद्या आणि टाटा-बिर्ला यांच्या परिस्थितीची तरतमभावाने परीक्षा केली गेली पाहिजे.

राज्यघटनेच्या मार्गदर्शक तत्त्वांचा मुडदा शासनयंत्रणाच पाडते, हे आपणाला कधी कळणार? धर्मनिरपेक्षतेचा गळा घोटून तीर्थक्षेत्रविकासाच्या नावाने अब्जावधी रुपयांची खैरात करणारे मंत्री विवेकहीन, तारतम्यहीन झाले, असंच म्हणावं लागेल. गरिबांना पोटभर अन्न मिळावं म्हणून जो धडपडतो, त्याला या देशाचा नेता म्हणावं आणि त्या अन्नात कायदे, नियम यांची माती मिसळतो, तो देशहिताचा शत्रू असंच आपण मानावं! धान्य कुजून जातं आणि माणसं अन्नाअभावी कुपोषणाचे बळी होतात, ही विसंगती संपवण्याचा विचार तारतम्याने आपण कधी करणार?

संस्कार, श्रद्धा, आस्था अशा धार्मिक प्रदूषण पसरवणाऱ्या वाहिन्यांवर कधी कधी वयाची पंचविशीही पार न केलेले, मेकअपने चकचकीत, आकर्षक वाटणारे तरुण-तरुणी प्रवचन करताना दिसतात. त्यांचं स्वरूप आणि त्यांचे विरक्तीचे विचार यांचा मेळ बसत नाही. नजरेत आसक्ती आणि जिभेवर विरक्ती, असा हा एकूण देखावा पाहून तारतम्याचा कुठेतरी लोप झाला आहे, एवढं निश्चित जाणवतं. शहाणी माणसं मात्र विचारातील, माणसातील, तरतमभावनेचा शोध घेणं कधीच सोडत नाहीत, कारण तारतम्यभाव हा त्यांचा प्राण असतो. तो ओळखण्यासाठी लक्षात असू दे-

हिरा आणि गारा । सारख्या दिसती
पारख्याच्या हाती । कळे मोल ॥१
सज्जन दुर्जन। दिसती सारखे
जाणती पारखे । तारतम्ये ॥२
सर्वांसाठी दया । सवार्साठी क्षमा
सर्वांसाठी प्रेमा । विसंगत ॥ ३
दुष्टा द्यावा दंड । शिक्षा उदंडाला
क्षमा प्रमादाला । सज्जनांच्या ॥४
मिथ्यावादी धर्म । समूळ खंडावे
धर्मांधा दंडावे । न्यायानेच ॥५
तरतमज्ञान । असावे सर्वत्र
गोत्र, मित्र, पुत्र । सर्वांसाठी ॥६
सोने आणि माती । मोल भिन्न त्यांचे
सोंग विरक्तीचे । कशासाठी ॥७
उत्तम मध्यम । अधम ओळखा
देऊ नका धोका । सद्बुद्धीला ॥८



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

**प्रबोधन**

# घरावर प्रेम करा!

अन्न, वस्त्र आणि निवारा या तीन मूलभूत गरजांत अन्न हे प्रारंभी तर निवारा- घर हे अंती असतं. पण शेवटी असलं तरी घर हे महत्त्वाचंच आहे. कारण सर्वसामान्य माणसं आपल्या माथ्यावर छप्पर असावं आणि आपल्या छपराखालीच आपलं जीवन संपावं, अशी इच्छा उराशी बाळगून जगत असतात. म्हणूनच अन्न-वस्त्राइतकंच घरही जीवनाधार असतं.

अशा घरावर भ्रमिष्ट गुरूच्या नीच उपदेशाने किंवा मानवताद्रोही विरक्तीने भरलेल्या पोथ्या वाचून लाथ मारून गृहत्याग करणारे असतात. स्पष्टच सांगायचं तर वैराग्याचं वारं मेंदूत घुसलेला माणूस घरात जन्मणं हे घराचं, समाजाचं आणि देशाचं दुर्दैवच असतं. घरावर प्रेम नसणारा माणूस हे विश्वची माझे घर, अशी समर्थ भावना दुबळ्या मनात ठेवूच शकत नाही. चॅरिटी बिगिन्स ॲट होम, असं उगीच म्हटलेलं नाही. घराचं कल्याण करणारा माणूसच जगाचं कल्याण करू शकेल. या विचारानेच वैराग्याच्या झटक्यात गृहत्याग करणाऱ्याला विचारायला हवं-

घरावरी प्रेम । तुझे आहे का रे
मग का मंदिरे। शोधतोशी ॥१
आईबाप घरी । दैवते ती थोर
स्वगार्हून घर। श्रेष्ठ आहे ॥ २
बाळकृष्ण घरी । लीला पहा त्याच्या
नको देवळांच्या । नादी लागू ॥ ३
घराला स्वर्गाचे । स्वरूप देणे हे।
महान कार्य है। हाती घेऊ ॥४

घराला आणि स्वदेहाला मंदिर मानणं या थोर कृतज्ञ मनोवृत्ती आहेत. त्यांच्या जोपासनेचा अहर्निश विचार निदान शहाण्यांनी तरी करावा.

ज्येष्ठ, मानवतावादी, निरीश्वरवादी कबीरदास हे अत्यंत परखड आणि चिकित्सक संत होते. सामान्यांनी घरंदारं त्यागून देवाधमार्मागे पिसाटासारखं धावू नये म्हणून या महात्म्याने मोठ्या तळमळीने या घराचं माहात्म्य सांगितलं आहे-

घर में जोग, भोग घरही में
घर तज वन, नहीं जावै ॥ १
घर में जुक्त, मुक्त घरही में
जो गुरू अलख लखावै ॥ २

अर्थात, घरात राहूनच योग, भोग सर्व काही करता येतात. घरात राहूनच ईश्वराचं ध्यान, चिंतन करून व उन्मनी अवस्था प्राप्त करून ईश्वराच्या धुंदीत राहाता येतं. त्यासाठी घराचा त्याग करून संन्याशासारखं बाह्य त्यागाचं, भगवी वस्त्रं परिधान करावयाचं, दाढी व जटा वाढवण्याचं प्रदर्शन करण्याची गरज राहात नाही.

स्वामी विवेकानंद दिग्विजयी संन्याशी होते. पण त्यांनाही गृहस्थजीवनाविषयी, घरादाराविषयी आस्था होती. ते म्हणतात, 'खूप उद्यम - उत्साहाने अथोर्पार्जन करून कुटुंबाचं, दहा जणांचं प्रतिपालन करायला हवं. शक्य तितकी चांगली कामं करायला हवीत. हे नाही करू शकलात, तर कसले मनुष्य तुम्ही? साधे गृहस्थदेखील होऊ शकला नाही आणि म्हणे मोक्ष मिळविणार! सुरत बघा!' ते पुढं म्हणतात, 'गृहस्थच समाजजीवनाचं केंद्र ! वित्तसंपादन आणि त्याच्या सत्कार्यात व्यय ही त्याच्या दृष्टीने उपासनाच होय!'

संत तुकोबाराय यांचा एक अभंग विरक्त आध्यात्मिक मंडळीत फारच लोकप्रिय झालेला आहे. आवा चालली पंढरपुरा, वेशीपासून फिरली घरा । असा प्रारंभ असलेल्या या अभंगात प्रपंच, घरदार यात गुंतलेल्यांवर तुकोबारायांनी उपहासात्मक टीका केली आहे. ही टीका उघड करायची तर सांगावंसं वाटतं-

तुकोबाची आवा। पंढरी निघाली
मला ती भेटली। वेशीपाशी ॥१
म्हणे, 'पंढरीला जाऊनिया येते
लक्ष ठेवा थोडे । घरावरी ॥ २
सून माझी नवी। थोडी धांदरट
नाही काही नीट । तिला सुचे ॥३
पुत्र माझा वेडा। काहीही देईल
कोणीही नेईल। जपलेले ॥४
साठवले धान्य । लिंपली कणगी
वषार्ची पोटगी। कोणी नेती ॥५
जिकीर जन्माची । पोरांना न कळे
सर्व जपलेले। सांभाळा हो ॥६
ना तरी पडेल । उपास साऱ्यांना
सांगाल पोरांना । समजून ॥७
तेव्हा मीच म्हणे । 'असे हे असता
पंढरीस जाता। कशासाठी ॥८
घर ही पंढरी । पुत्र-सून जोडी
विठ्ठल-रुक्मिणी । घरी आहे ॥ ९
घरातील सुख। स्वगार्हून मोठे
तुम्हा का न वाटे। मला सांगा? ॥ १०
'खरे की हो बाबा। झाले मज ज्ञान
फिटले अज्ञान । माझे आता ॥ ११
उखळ-मुसळ-जाते । तेथेचि ईश्वर
मन गुंते फार । तोच मोक्ष' ॥ १२



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# सपाटेंच्या दानामुळेच सांस्कृतिक भवन साकार





माजी महापौर मनोहर सपाटे आणि माझा परिचय तसा जुनाच आहे. संस्थाचालक म्हणून त्यांच्या सहवासात राहण्याचा मला योग आला. अध्यक्ष सपाटे हे जसे कर्तृत्वान तसे ते दानशूर देखील आहेत. याचा प्रत्यय मला त्यांनी मराठा मंदिर मुंबई यांच्यकडून हरिभाई प्रशालेच्या मागे मिळालेली वसतिगृहाची जागा सपाटे यांना ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी दिली होती. परंतु त्यांनी ती वैयक्तिक न ठेवता समाजासाठी म्हणून दान दिली. आज त्याच वास्तुत त्यांच्याच नेतृत्वाखाली आणि नावाने सुध्दा मनोहर सपाटे सांस्कृतिक भवन अर्थात मंगल कार्यालय उभारले. त्यामुळे त्यांचे मोठेपण अवर्णनीय आहे. आज या जागेची किंमत ५० कोंटीच्या घरात असेल. परंतु सपाटे यांनी समाजासाठी आणि समाजातील मुलांसाठी त्यावर पाणी सोडून त्याला सार्वजनिक रुप दिले. यातच त्यांचे मोठेपणा दिसून येते. अर्थातच या कामी त्यांना या संस्थेत काम करणारे त्यावेळेचे कै. चंद्रकांत येवले, मधुकर लोंढे, माजी प्राचार्य डॉ. अनिल बारबोले, प्राचार्य डॉ. मधुकर पवार, मुख्याध्यापिका सुजाता जुगदार, दीपक डुरे-पाटील, प्रा. संतोष गवळी, दत्ता सुतार, राजु कसबे, विलास धरेकर, संतोष अलकुंटे यासारखे प्रामाणिक कर्मचारी यांचीही साथ तेवढीच मोलाची ठरली. त्यामुळेच आज ही देखणी वास्तु उभी आहे. तिला देण्यात आलेले नावही इमारतीला साजेशे असेच आहे. सपाटे हे आज वयाची ७४री साजरी करीत आहे ते शंभरी पार करोत. १९९३ साली सपाटे यांनी छत्रपती शिवाजी प्रशालेच्या इमारतीतील जागा कमी पडू लागल्याने व्यवसायीक अभ्यासक्रमासाठी स्वतंत्र विभाग म्हणून याच मराठा मंदिर येथे स्थलांतरीत करण्याचा धाडसी निर्णय घेतला. त्यांच्यामुळेच संस्थेला हे वैभव पाहायला मिळत आहे. प्रा. महेश माने यांची त्यांना मिळणारी साथही महत्वाची आहेत. त्यामुळेच आज आमची संस्था चौफेर प्रगती करीत आहे. सपाटे यांना आजच्या शुभदिनी वाढदिवसाच्या शुभेच्छा देऊन त्यांना परमेश्वराने दीघार्युष्य द्यावे, ही प्रार्थना करतो.

**- दत्ता भोसले**
अध्यक्ष, कॉलेज कर्मचारी
युनियन सोलपूर जिल्हा

# कर्मयोगी संत गाडगे बाबा

सुंदरते ध्यान कीर्तनी शोभले।
करी धरियेले गाडगे काठी ।
डोई शुभ्र केस उडती वाऱ्याने ।
चिंध्या प्रकाशाने चमकती ।
कीर्तनाचे रंगी डुल्लतो प्रेमाने ।
भजनानंद म्हणे डेबुजीचा ।

असे रसाळ वर्णन त्यांचे केले जाते त्या श्री संत गाडगेबाबांची आज जयंती आहे. त्यांचे एकूण जीवन तेजस्वी आणि ओजस्वी होते.ते म्हणायचे,' धर्म सांगायचं नसतो, जगायचं असतो. धर्मग्रंथात नसतो जीवनात असतो. मी तुम्हाला सर्व धमार्चे सार सांगतो- भुकेलेल्यांना अन्न, तहानलेल्यांना पाणी, उघड्या नागड्यांना वस्त्र, बेघरांना आसरा, बेकरांना रोजगार,अंध अपंगांना औषध, मुक्या प्राण्यांना अभय द्या. कर्ज काढू नका.कष्टशिवाय भाकर खाऊ नका. निरंतर उद्योग करा. हाच खरा धर्म.'

संत गाडगेबाबांनी सांगितलेल्या खऱ्या धर्माची व्याख्या जनसामान्यात रुजली पाहिजे. 'जगातील सर्वांचे दुःख हेच माझे दुःख!' हे सत्य उमगलेल्या सत्यशोधकाच्या मालिकेत संत गाडगेबाबा आपल्याला पाहायला मिळतात. 'व्यसन व वैभिचारापासून जनतेला दूर करणे, साक्षरता, साक्षेप, अखंड उद्योग, सहकार आणि काटकसरीने वागण्यास लोकांना तयार करणे. सावकाराच्या दारापाशी आयुष्यात कधी जायचे नाही. देव भोळेपणा आणि अनिष्ट रूढी रिवाजापासून जनतेला सावध करणे.' हे त्यांच्या आयुष्याचे सार होते.

'मला कुणी शिष्य नाही, मी कुणाचा गुरु नाही!' हा त्यांच्या स्वाभिमानी बाणा आजच्या पिढीने आत्मसात केला पाहिजे. चिकित्सा न करता कोणत्याही भोंदू बाबाचा भक्त होऊन त्याच्या मागे फिरण्यापेक्षा ; लाथ घालेन तेथून पाणी काढेन! हा आत्मविश्वास आज प्रत्येकाने कमवला पाहिजे . गाडगेबाबा आपल्या कीर्तनात नेहमी,' उपाशी रहा पण कर्ज काढून सावकाराच्या जाळ्यात अडकू नका', असा सल्ला द्यायचे. त्यांच्या आजोबाची जमीन सावकारी कजार्साठी गहान पडली. सावकाराने हिशोब न दाखवता जमिनीवर कब्जा करण्याचा प्रयत्न केला.डेबुजीनी त्याला प्रखर विरोध केला. तरीदेखील शेवटी त्यांचे आजोबा हंबीररावणी १५ एकर शेत जमीन सावकाराच्या घशात ओतली. तो तंटा मिटवला. यातून गाडगे बाबांनी फार मोठा धडा घेतला. सावकारी पाश किती करकसून शेतकऱ्याच्या मानेभोवती आवळला जातो याचा प्रत्यक्ष अनुभव त्यांनी घेतला होता.

गाडगे बाबांच्या पत्नी कुंताबाई यांना मुलगी झाल्यावर बारशाच्या दिवशी पाहुण्या-रावळ्यांनी दारू मटणाची मागणी केली.त्याकाळी कर्ज काढून,भीक मागून हे देवकार्य करावे लागायचं.बोकडाची कंदुरी आणि दारू जात-गोतवाल्यांना दिल्याशिवाय जमत नव्हतं. या विरुद्ध गाडगेबाबानी दंड थोपटले. मटन दारू ऐवजी बुंदीचे लाडू, पोळ्या असा बेत केला. जात कुळीला बट्टा लावला! म्हणून गोतावळ्यातील मंडळी ओरडू लागली. त्यांनी लोकांना समजावून सांगितले,' मटन दारूची रुडी धर्माची नाही. आपल्या अडाणीपणाची नि जिभेच्या चोसल्याची आहे.जीव जन्माला आला, की दुसऱ्या एका जीवाची हत्या आणि कोणी मेला तरी हत्या हा काय धर्म समजता का?' अशा प्रकारच्या उपदेशातून लोकांच्या मन, मेंदूवर प्रभाव टाकण्याची कला डेबुजींनी स्वतः उचललेल्या क्रांतिकारक पावलातून निर्माण केली. लोकांच्या आचार विचारांना धक्का देण्याचे तंत्र डेबुजीने सफाईदारपणे आयुष्यभर वापरले.

ज्याप्रमाणे भगवान बुद्धाने दुःखाचा शोध घेण्यासाठी आणि निवार्णीचा मार्ग जगाला दाखवण्यासाठी आपल्या राजवैभवाचा त्याग केला,त्याप्रमाणे संत गाडगेबाबांनी आजोबाची शेतीवाडी, घरात धन धान्य,दुध दुभत्यांचा सुकाळ, प्रतिष्ठा, आज्ञाधारक पत्नी, दोन गोजिरवाण्या मुली, आई, आजी-आजोबा या साऱ्यांचा त्याग करून घर संसार सोडले. स्वतः मधील काम, क्रोध, लोभ मोह, मद,मत्सर या षड्रिपूचा त्याग केला. पाय नेतील तिकडे जायचे, मिळेल तसली भाकरी खायची, अडचणीत सापडल्यांना मदत करायची आणि पुढे मोकाट्याने चालत जायचे, हा नित्यक्रम त्यांनी आरंभला. एखाद्या शेतात खळं चालू असेल तर तेथे विना मोबदला राबराब राबायचे. थंडी, वारा, पाऊस कडाक्याचे ऊन, तुफान, वावटळ, रानातल्या वनव्यांची आग या साऱ्यांना तोंड देत, जंगलातील साप, विंचू, वाघ, लांडगे यांना न घाबरतात सतत अनेक वर्ष ते चालत राहिले. ज्या गावात ते जात तेथे हातातील झाडूने साफसफाई करत. सायंकाळी त्याच गावातील लोकांच्या डोक्यात झालेला कचरा आपल्या शेलक्या शब्दातून दूर लोटत. अडाणी नाक्षर म्हणून स्वाभिमानाला मुकलेल्या श्रमजीवी कष्टाळू सामान्य जनांना संसार सावरण्याची अक्कल शिकवत. त्यांची कीर्ती प्रांतोप्रांती पसरली. 'चापरेबुवा, वट्टी साधू, लोटके महाराज, चिंधेबुवा, गाडगे महाराज अशा विविध नावाने ते ठीक ठिकाणी ओळखले जाऊ लागले. आपल्या कीर्तनातून त्यांनी समाजातील अंधश्रद्धा, निरक्षरता, देव भोळेपणा जादूटोणा, चमत्कार, हिंसा यावर प्रहार केला. तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी घाट बांधले, धर्मशाळा उभा केल्या. शाळा आणि बोर्डिंग सुरू करणाऱ्यांस मदत केली. हे सर्व करत असताना लोकांनी त्यांना देणग्या दिल्या. त्यामधून त्यांनी स्वतःसाठी एखादा मठ किंवा साधी झोपडी सुद्धा उभारला नाही. ते सतत जनकल्याणासाठी भटकत राहिले. कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, प्रबोधनकार ठाकरे या सर्वांवर गाडगे बाबांचा प्रभाव होता.

अशा या कर्मयोगी संताचे विचार आणि कृती बहुजन समाजातील लोकांचे मन,मेंदू,मनगट मजबूत करणारे होते.



**- किशोर जाधव,** सोलापूर
मो. नं. ९९२२८८२५४१

# राजराजेश्वरी प्राथमिक शाळेत मराठी दिन साजरा




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** विनायक नगर येथील राजराजेश्वरी बालक मंदिर मराठी प्राथमिक शाळेत मराठी राजभाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. प्रथम शाळेच्या मुख्याध्यापिका वैशाली कुंभार, ज्येष्ठ शिक्षक बसवराज बिराजदार, वैशाली गुजर यांच्या हस्ते ज्येष्ठ कवीवर्य वि.वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी सोमनिंग गुंडे, ओम कुंभार, रितेश कंजेरी, विमल यनगंटी, समर्थ खट्याळ, लहरी यलगेटी, चैतन्या बुक्का, निवेदिता चिंताकिंदी आदी विद्यार्थ्यांनी मराठी दिनाचे महत्त्व सांगितले. भक्ती पुजारी या विद्यार्थीनीने 'मायं मराठी' हे सुंदर मराठी स्फूर्ती गीत सादर केले. निवेदिता चिंताकिंदी या विद्याथीर्नीने सुंदर चारोळ्या व विनोद सादर केले. यावेळी मुख्याध्यापिका वैशाली कुंभार म्हणाले, अमृतासारखी गोड आणि सोपी असलेली मराठी भाषा ही आपल्या महान महाराष्ट्राची मातृभाषा आहे म्हणून आपल्या सर्वांना मराठी भाषेचा अभिमान असायला हवी.विद्यार्थ्यांनी मराठी भाषेतील प्रत्येक ग्रंथ, पुस्तक, नाटक, कविता आणि कादंबरी वाचन करुन चांगले आदर्श साहित्यिक बनावे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निवेदिता चिंताकिंदी व चैतन्या बुक्का यांनी केले तर लहरी येलगेटी यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी वृंदानी परिश्रम घेतले.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स (0217)2605091 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone-0217-2605091 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# प्रशांत कोरटकरवर कारवाईची मागणी



**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** कुळवाडी भूषण, बहुजन प्रतिपालक छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, राष्ट्रमाता जिजाऊ यांची बदनामी करून इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत यांना जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या महापुरुष विरोधी प्रशांत कोरडकर यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याबाबत टेंभुर्णी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दीपक पाटील यांना इक्वालिटी फाउंडेशन व बहुजन मुक्ती पार्टी यांच्याद्वारे निवेदन देण्यात आले.

निवेदन देताना इक्वालिटी फाउंडेशन संस्थापक महावीरजी वजाळे, बहुजन मुक्ती पार्टी माढा लोकसभा अध्यक्ष महेंद्रजी सोनवणे, बहुजन मुक्ती पार्टी माढा लोकसभा प्रभारी प्रशांतजी गायकवाड, माणिकआबा किर्ते, गणेशजी खरात, नागनाथजी जगताप, राजवर्धनजी वजाळे, गौरवजी गाडे उपस्थित होते.

बहुजन समाजामधील सर्वच महापुरुषांची बदनामी करणाऱ्यांमध्ये ब्राह्मण वर्गाचे लोक सतत अग्रेसर असतात अशा लोकांना भाजप सतत पोहोचण्याचे काम करत आहे ही बाब अत्यंत गंभीर आहे.

महापुरुष विरोधी प्रशांत कोरडकर याच्यावरती कायदेशीर कारवाई झाली पाहिजे असे महावीर वजाळे पोलीस निरीक्षक दीपक पाटील यांना निवेदन देताना भावना व्यक्त केली तसेच महत्वाची बाब म्हणजे महापुरुषांची बदनामी करणाऱ्यांमध्ये केवळ आणि केवळ ब्राह्मण लोकच प्रत्येक वेळी का असतात यावरती बहुजन समाजामधील युवक कधी विचार करणार आहेत का नाही असा महेंद्रजी सोनवणे यांनी प्रश्न उपस्थित केला?

# लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयात दिनांक 28 फेब्रुवारी 2025 रोजी राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य सागर महाजन हे लाभले होते. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून लोकमंगल कृषीव्यवसाय व व्यवस्थापन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सचिन फुगे व लोकमंगल विज्ञान व उद्योजकता महाविद्यालयाचे प्राचार्य अंकुश गोरट्याळ हे लाभले होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते नोबल पारितोषिक विजेते डॉ सी. व्ही. रमन यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यानंतर प्रमुख पाहुणे डॉ सचिन फुगे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यामध्ये त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की 2025 साठी राष्ट्रीय विज्ञान दिवसाची थीम आहे, "विकसित भारतासाठी विज्ञान आणि नवोन्मेषामध्ये जागतिक नेतृत्वासाठी भारतीय तरुणांना सशक्त करणे" ही आहे. कृषीच्या विद्यार्थ्यांनी विज्ञानातील विविध तंत्रज्ञान वापरून कृषी क्षेत्रातील समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. तसेच कृषी संशोधन करण्यासाठी सक्रिय सहभाग घेतला पाहिजे. महाविद्यालयाचे प्राचार्य सागर महाजन यांनी विद्यार्थ्यांना आपल्या मनोगतातून विज्ञान दिन साजरा करण्यामागे उद्देश व महत्व पटवून दिले. यामध्ये त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की भारतीय संशोधकांची ओळख विद्यार्थ्यांना व्हावी व विज्ञानातील संशोधनाचा उपयोग राष्ट्राच्या विकासासाठी व उन्नतीसाठी व्हावा हा विज्ञान दिन साजरा करण्यामागे मुख्य उद्देश आहे.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थीनी मैथिली कोळी व आभारप्रदर्शन विद्यार्थीनी तृप्ती जाधवर यांनी केले. या कार्यक्रमाचे औचित्य साधून महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त पोस्टर्स सादरीकरण आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले.

या सादरीकरणात वनस्पतीं ऊती संवर्धन व त्याचे फायदे, जैवतंत्रज्ञानाचे भविष्य, नॅनोटेक्नॉलॉजीचे फायदे, जनुकीय परिवर्तन तंत्रज्ञान फायदे व तोटे आदी विषयांवर पोस्टर्स सादरीकरण करण्यात आले. यामध्ये महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या कार्यक्रमाचे परिवेक्षक म्हणून प्रा. निशा काटे, प्रा. कविता संभारम, प्रा. अंकिता पवार हे लाभले होते. या कार्यक्रमाचे समन्वयन प्रा. सायली बडेकर यांनी केले. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

# अजितदादा हेच अल्पसंख्यांकांचा विकास करणारे नेते - आ.नाईकवाडी



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शिव फुले शाहू आंबेडकर यांच्या विचाराचा वारसा आणि त्यांचा आदर्श घेऊन सर्व समाज घटकाला सोबत घेऊन जाणारे एकमेव नेते म्हणजे अजित दादा पवार अल्पसंख्यांक समाजातील प्रश्न शासन स्तरावर सोडण्यासाठी अहोरात्र प्रयत्न करणारे त्यांच्यासाठी झटणारे अजितदादा यांच्या पाठीशी उभे रहावे असे आव्हान प्रदेशाध्यक्ष अल्पसंख्यांक विभाग आमदार इद्रिस नाईकवाडी यांनी केले अल्पसंख्यांक समाजाचा विकास करून समाजाला पुढे घेऊन जाण्याची दृष्टी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी ठेवावी अजित दादा यांनी समाजासाठी केलेले विकास कामे लोकांपर्यंत पोहोचून पक्ष बळकट करावा अशा सूचना देखील नूतन पदाधिकाऱ्यांना दिल्या.

याप्रसंगी आमदार इद्रिस नाईकवाडी, प्रा.श्रीनिवास कोंडी, शहर जिल्हाध्यक्ष संतोष पवार,कार्याध्यक्ष जुबेर बागवान प्रदेश उपाध्यक्ष चंदनशिवे, जनरल सेक्रेटरी प्रमोद भोसले ज्येष्ठ नेते अँड.सलीम नदाफ, माजी परिवहन समिती सभापती आनंद मुस्तारे, फारूक मटके माजी नगरसेवक गणेश पुजारी, महिला आघाडी अध्यक्ष संगीता जोगधनकर, अल्पसंख्याक विभाग अध्यक्ष अमीर शेख, अल्पसंख्यांक विभाग जिल्हाध्यक्ष नजीर ईनामदार कार्याध्यक्ष संजीव मोरे, वैद्यकीय मदत कक्ष प्रमुख बसवराज कोळी, सहकार सेल विभाग भास्कर आडकी, महिला आघाडी शहर सचिव प्राजक्ता बागल, अर्चना दुलंगे, शहर - सचिव दत्तात्रय बनसोडे, प्रज्ञासागर गायकवाड,सामाजिक न्याय विभाग कार्याध्यक्ष अनिल बनसोडे, श्यामराव गांगर्डे, समदानी मत्तेखाने, मोईज मुल्ला दक्षिण विधानसभा कार्याध्यक्ष प्रदीप भालशंकर, जहीर शेख अल्पसंख्याक विभाग अध्यक्ष अशपाक कुरेशी, रझाक शेख, गफार तांबोळी, रिहान शेख, फैजन शेख, शाहीद शेख , सादिक तोतलबाग, सोशल मीडिया विभाग शहराध्यक्ष वैभव गंगणे, कामगार आघाडी विभाग अध्यक्ष मार्तंड शिंगारे, कार्याध्यक्ष संजय सांगळे जमील बागवान नय्युम सालार कार्याध्यक्ष अल्पसंख्याक विभाग सांगली आदी पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त उपस्थित होते.

# राज्यात सर्व जिल्हाधिकारी कार्यालयावर १० मार्च रोजी कंत्राटदार यांचा भव्य मोर्चा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील सर्व विभागाकडे राज्यातील जवळपास ३ लक्ष कंत्राटदार केलेल्या कामांचे अंदाजे ९० हजार कोटी रुपयांची देयके प्रलंबित आहेत. याबाबत महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ व राज्य अभियंता संघटना व बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया, राज्य हॉट मिक्स असोसिएशन, मजुर सहकारी संस्था यांनी शासनास वेळोवेळी निवेदन दिले तसेच वरिष्ठ स्तरावर मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व सार्वजनिक बांधकाम मंत्री व इतर मंत्री यांची भेटुन निवेदन दिले परंतु याचा काहीही उपयोग न झाल्याने ५ फेब्रुवारी २०२५ पासुन राज्यातील काम बंद आंदोलन सुरू केले होते याचा राज्यातील सर्व जिल्हा सगळीकडे परीणाम चांगला दिसत आहे.

आज मितीस काम बंद आंदोलन सुरू होऊन जवळपास २० दिवसापेक्षा जास्त कालावधी झाला आहे, परंतु शासनाकडून याबाबत काही ठोस पावले उचलेली जात नाही यामुळे आज वरील सर्व संघटनेच्या वतीने आज झुल्ल'ल्ली पद्धतीने कंत्राटदार यांची बैठक घेण्यात आली यांमध्ये राज्यातील सर्वच जिल्हा मध्ये सोमवार दिनांक १० मार्च २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय वर मोर्चा काढण्याचा निर्णय सदर बैठकीत एकमताने घेतलेला आहे अशी माहिती महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ व राज्य अभियंता संघटनेचे राज्य अध्यक्ष मिलिंद भोसले, बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया चे राज्य अध्यक्ष अनिल सोनावणे, राज्य मजुर फेडेरेशन चे अध्यक्ष संजीव कुसाळकर कुसाळकर, राज्य कंत्राटदार महासंघ चे कार्याध्यक्ष संजय मैंद, महासचिव सुनील नागराळे, खजिनदार निवास लाड, राज्य विभागीय अध्यक्ष सुरेश कडू पाटील, सुबोध सरोदे, मंगेश आवळे, प्रकाश पांडव, अनिल पाटील, प्रकाश पालरेचा, राज्य उपाध्यक्ष कांतीलाल डुबल, रवींद्र चव्हाण,राजेश आसेगावकर, प्रसिद्धी प्रमुख कौशिक देशमुख,राज्य अभियंता संघटनेचे महासचिव राजेश देशमुख, सचिव कैलास लांडे, राज्य संघटक नरेंद्र भोसले प्रशांत कांरडे , नितीन लवाळे, अन्वर अली, समीर शेख, लेबर फेडेरेशन चे शंकर चौगुले, दत्तात्रेय मुळे, सहित असंख्य पदाधिकारी उपस्थित होते.

# शासनाने शेतकऱ्यांना न्याय द्यावा



**करमाळा, (कटूसत्य वृत्त):-** हमीभावापेक्षा कमी दराने शेतमाल विक्री होत असेल तर हमी भाव व मार्केट मधील दर या दरातील फरकाची रक्कम शेतकऱ्यांना अनुदान रूपाने भावांतर भुगतान योजनेअंतर्गत दिली जावी अशी मागणी जगताप गटाचे युवानेते तथा करमाळा कृषि उत्पन्न बाजार समितीचे संचालक शंभूराजे जगताप यांनी राज्याचे पणनमंत्री ना. जयकुमार रावल यांच्याकडे केली आहे . पुणे येथे बाजार समित्यांची राज्यस्तरीय परिषद आयोजीत केली होती. या प्रसंगी जगताप यांनी ना. रावल यांची भेट घेवून चर्चा केली. मध्यप्रदेश सरकारने अशा प्रकारे "भावांतर भुगतान योजना" राबवून शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात दिलासा दिला होता त्याच धर्तीवर महाराष्ट्रात देखील बाजार समितीमध्ये विक्री केलेला शेतमाल व हमीभाव दर यातील फरकाची रक्कम भावांतर भुगतान योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना अनुदान रूपाने देऊन दिलासा द्यावा.

उदा:-जर तुरीला हमी भाव दर ७५५० रुपये क्विंटल इतका आहे व सध्या मार्केटमध्ये तूर ७००० रुपये क्विंटल इतक्या दराने विक्री होत असेल तर ५५० रुपये अनुदान रूपाने शासनाने शेतकऱ्यांना द्यावेत, अशी मागणी जगताप यांनी केली आहे.

# नवरंगे बालकाश्रम संस्थेला शासनाचा 'बालस्नेही पुरस्कार'

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** वा.बा. नवरंगे बालकाश्रम, पंढरपूर या संस्थेला महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या बालस्नेही पुरस्कार 2024 साठी उत्कृष्ट बालगृह या नामांकनासाठी पुणे विभागातून निवड झाली आहे.

हा पुरस्कार सोहळा यशवंतराव चव्हाण सेंटर नरिमन पॉईट मुंबई येथे दिनांक 3 मार्च 2025 रोजी दुपारी 1.00 वाजता पार पडणार आहे. कार्यक्रमास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार व महिला व बाल विकास मंत्री अदिती तटकरे यांची उपस्थितीत राहणार आहे.

अनौरस बालकाशिवाय आई वडीलांपैकी कोणाचाही मृत्यू, दारिद्र्य, आई वडील विभक्त होणे आदी कारणामुळे निराधार गृहहीन होणारी मुले व मुलींना या संस्थेत प्रवेश दिला जातो. संस्थेत दाखल झालेपासून मुल, मुलीची पहिल्या दिवसापासून ते ही मुले सर्वाथार्ने स्वतःच्या पायावर उभे राहीपर्यंत त्यांची जबाबदारी ही संस्था घेते. आतापर्यंत अनेक अनाथ निराधार मुले मुली यांचे समाजात दत्तक देवून चांगले पुनर्वसन केलेले आहे. या कायार्ची दखल घेऊन शासनाचा बालस्नेही पुरस्कार जाहीर केलेला आहे.

महाराष्ट्रात व विशेषतः सोलापूर जिल्ह्यांत ही संस्था १४९ वर्षे महिला व बाल कल्याण क्षेत्रात सामाजिक कार्य करीत आहे. महिला व बाल विकास आयुक्त पुणे, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी सोलापूर तसेच संस्थेचे अध्यक्ष, सदस्य, बालक कल्याण समिती, सोलापूर यांनी संस्थेच्या विकासासाठी वेळोवेळी मार्गदर्शन केले असल्याची माहिती संस्थेच्या अधिक्षिका राजश्री गाडे व धर्मराज डफळे यांनी दिली.

# आरपीआयच्या मागणीला यश

## मानेगाव अॅट्रासिटी गुन्हातील आरोपीला अटक - आंदोलन मागे

**माढा (कटूसत्य वृत्त):-** मानेगाव ता.माढा येथे घडलेल्या अॅट्रासिटी प्रकरणातील आरोपीला अटक करण्याच्या मागणीसाठी आरपीआय आठवले गटाच्या वतीने माढा पोलिस प्रशासनाला निवेदन देऊन आंदोलनाचा इशारा दिला होता.

माढा पोलिसांनी आरोपिला अटक केल्याने आरपीआयच्या मागणीला यश आले असून माढा पोलिसांनी

आरोपीला अटक केल्याचे लेखी पत्र आरपीआय संघटनेला दिल्यानुसार आरपीआयने निषेध आंदोलन मागे घेतले आहे.मानेगांव बंद चा इशारा पुकारला गेला होता.बंद ही मागे घेतला आहे.

यावेळी आरपीआय सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष अमर बडेकर, माढा तालुका युवक उपाध्यक्ष चंद्रकांत माने, ग्रा.प. सदस्य हारेष कारंडे, बंडू माने, किरण माने, विजय डोळसे आदीसह आरपिआयचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# पंढरपूर नगरपरिषद, पंढरपूर

फॅक्स:०२१८६-२२३००६ दूरभाष क्र.०२१८६-२२३०१३/२२३२५३/२२३१८७.
ई-मेल-comcpandharpur@gmail.com

जा.क्र./पं.न.पं./न.अ./११५८/२०२५ दिनांक:-२८/०२/२०२५

**शुद्धीपत्रक**

या शुद्धीपत्रकाद्वारे जाहिर करणेत येते की, पंढरपूर नगरपरिषद बांधकाम विभागाकडील निविदा क्र. ११ सन २०२४-२५ मधील पंढरपूर शहरातील गुजराथी कॉलनी मधील समाज मंदिर येथे वाचनालयासाठी फर्निचर तयार करणे ही निविदा भरणेसाठी पुढे ७ दिवसांची दि. ०३/०३/२०२५ पर्यंत मुदतवाढ देत आहे.

सही/-
(डॉ.प्रशांत जाधव)
मुख्याधिकारी
पंढरपूर नगरपरिषद, पंढरपूर

Classified - छोटी जाहीरात

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...



दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...
व्यसन + टेन्शन + भिती + चिंता +
नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश ..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)




डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र
फोन: 9552619752
कॉल/व्हॉटस्अॅप करा...
दारू... अंमली पदार्थ...
राम राम करा...
501% रिझल्ट

# कवींच्या काव्य मैफलीत व ग्रामीण कथात रंगला मराठी भाषा गौरवदिन



**अकलूज (कटूसत्य वृत्त):** कवी कुसुमाग्रज, भा. रा. तांबे यांच्यासह सूर्यकांत भिसे, वीरेंद्र पतकी, प्रतिभा गोडसे, गणेश गोडसे या कवींच्या काव्य मैफलीत व ता. सा. बावळे यांच्या ग्रामीण कथांनी मराठी भाषा गौरवदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. महाराष्ट्र ग्रामीण साहित्य विकास मंडळ, अर्धनारी नटेश्वर महाविद्यालय, वेळापूर (रा.सो.यो.शिबिर) व जि. प. प्राथमिक शाळा धानोरे यांच्या संयुक्त विद्यमाने धानोरे येथे मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून काव्य वाचन व कथाकथन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कवी कुसुमाग्रज व सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील यांच्या प्रतिमांचे पूजन करुन काव्य मैफलीस प्रारंभ झाला. ज्येष्ठ कवी कुसुमाग्रज यांच्या "माझ्या मराठी मातीचा, लावा ललाटास टिळा हिच्या संगाने जागल्या, दऱ्या खोऱ्यांतील शिळा" या कवितेने काव्य मैफलीस प्रारंभ झाला . गणेश गोडसे , प्रतिभा गोडसे , वीरेंद्र पतकी, अभिजीत घाडगे व सूर्यकांत भिसे यांनी आपल्या कवितांचे सादरीकरण करीत रसिक श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. भा.रा. तांबे यांच्या "या बालांनो या रे या". या कवितेने मुलांना ठेका धरायला लावला तर संत तुकडोजी महाराज यांच्या "या झोपडीत माझ्या...." या कवितेने सुखाच्या व्याख्या स्पष्ट केल्या. ता. सा. बावळे यांच्या " माझ्या बा चा दहावा " या ग्रामीण कथेने हास्याच्या मैफलीत रसिक श्रोते चिंब झाले. या कार्यक्रमाला जी.प.शाळा धानोरेचे शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष हनुमंत देवकते, मुख्याध्यापक आबासाहेब देवकते, रा.सो.यो.चे कार्यक्रम अधिकारी प्रा दादा साठे, प्रा अभिजीत घाडगे, डॉ विठ्ठल क्षिरसागर, डॉ वैशाली मोरे, प्रा गोरख मंगवडे, लक्ष्मीकांत कुलकर्णी, शेख मॅडम, बनसोडे मॅडम, रणजीत बनसोडे तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कटूसत्य शब्दकोडे क्र. ९९



**उभे शब्द :** १) लगेच उत्तर देणारा, वेळ न दवडता उत्तर देणारा २) धनी ३) सन उलट लिहा ४) सर्कशीतील विदूषक, पत्त्यातील एक पान ५) अंगावरील छोटा काळा ठिपका ६) पावा, मुरली ७) दुर्ग, किल्ला ८) महाराष्ट्रातील एक देशपातळीवरील नेते १२) लोकांचा समूह १३) हाताच्या चपळतेने फसविणे, ***** करणे १५) मोठे, उज्वल असे यश १६) एक रास २३) कमा उलट लिहा २५) राज्याचे माजी मुख्यमंत्री, सध्या केंद्रीय मंत्री- **** राणे २६) टीव्ही सिरीयल निर्माती- *** कपूर २७) याची धाव कुंपणापर्यंत अशी एक म्हण आहे २८) बे दुणे ३१) साईबाबांचा एक संदेश- *** मालिक एक ३२) लाकडाचे गोदाम ३३) मावशीचा मुलगा ३४) आ. नितेश राणे यांचा मतदारसंघ ३५) क्रिकेटमधील धाव (इंग्रजीत) ३७) तल्लीन, मग्न होणे ३९) जंगल, अरण्य ४३) एकाग्र, मग्न होणे ४४) एक अभिनेते- *** दामले ४६) फळातील गोड द्रव ४८) सूर्य (इंग्रजीत)

**आडवे शब्द :** १) श्रीरामाचा परमभक्त, वायुपुत्र ४) कोल्हापूर जिल्ह्यातील एक प्रसिध्द दैवत ७) श्री गजाननाचे एक नाव ९) लहान बाळाला ही टोचतात १०) मंदिराच्या शिखरावर हा बसवितात ११) परीट, धोबी १३) पराजय, जीतच्या विरूध्दार्थी १५) रांग १६) दम उलट लिहा १७) खर्चच्या विरूध्दार्थी १८) चार आणि तीन मिळून होणारी संख्या १९) आमीर खान अभिनीत एक चित्रपट- * इडियटस् २०) विश्वचषक (इंग्रजीत) २१) चाळीस आणि बारा मिळून होणारी संख्या २२) एक पेय, टी (मराठीत) २३) एक मराठी महिना २४) याच्यापासून शिरा बनवितात २५) गटर २६) सात गुणिले तीन २९) रक्षाबंधनवेळी बहीण भावाला बांधते ती ३०) एक जंगली हिंस्त्र पशु ३२) लग्नातील नवऱ्या मुलाची आई ३४) रांग, लाईन (हिंदीत) ३६) या कंपनीचे च्यवनप्राश प्रसिध्द आहे ३८) उन्हातान्हात भटकणे, **** फिरणे ४०) एक म्हण- दाम करी ** ४१) श्रीमंत (हिंदीत), शाहरूखचा एक हिंदी चित्रपट ४२) बनावट ४४) रयत, जनता, एक म्हण- जसा राजा तशी ** ४५) बोझा, वजन ४७) एक (इंग्रजीत) ४८) उत्सवाचा दिवस ४९) पर्जन्य ५०) निवडणुकीत उमेदवाराला मत देणे

## सुडोकु - 189

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | | 6 | 3 | 4 | | 8 | 1 | |
| | 5 | 1 | 7 | | | 3 | | |
| 4 | 7 | | | 9 | 1 | | | 5 |
| | | | 9 | | 3 | | | 2 |
| | | 2 | | 8 | 7 | | | |
| 1 | | 7 | 2 | | | 6 | | |
| | 8 | 5 | | | 9 | 1 | | |
| | 3 | 4 | | 6 | | | | 9 |
| | 1 | | 5 | | 8 | 7 | | 6 |

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

